दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१६ नोव्हेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ८६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 16 Nov 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 86 ● Pages 4 ● Rate 4 Rs


### मुंबईत महायुतीचाच महापौर होईल

**मुंबई–** काँग्रेसने मुंबई महापालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. मुख्यमंत्र्यांनी यावरही भाष्य केले. ते म्हणाले, विरोधी पक्ष एकत्रित लढतो की स्वतंत्र लढत आहे यापेक्षा मुंबईच्या जनतेचा महायुतीवर विश्वास आहे. जनतेने महायुतीचाच महापौर बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे निश्चितपणे कोण कसे लढत आहे हा त्यांचा प्रश्न आहे. मात्र तिथे महायुती निवडून येईल यात शंका नाही.

अजित पवार यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आहे. पत्रकारांनी याविषयी मुख्यमंत्र्यांचे लक्ष्य वेधले असता त्यांनी अजित पवारांनी राज्यातील काही मुद्यांवर अमित शहांची भेट घेतली असेल, असे ते म्हणाले.

# बिहारचा निकाल काँग्रेसच्या विषारी प्रचाराला जनतेचे उत्तर-मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा

## काँग्रेस पक्ष एमआयएमच्याही खाली गेल्याचा टोला

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–बिहारच्या निवडणुकीत भाजप व एनडीए आघाडीवर असून जवळपास विजय हा निश्चितच झाल्याचे दिसत आहे. यावर प्रतिक्रिया देताना काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. देवेंद्र फडणवीस हे राजधानी दिल्ली येथे असून पत्रकारांशी संवाद साधताना बिहार निवडणुकीवर प्रतिक्रिया दिली आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, भाजप आणि एनडीए या सर्व घटक पक्षांच्या बिहार युनिटचे मी अभिनंदन करतो आणि बिहारच्या जनतेचे आभार मानतो. त्यांनी मोदींच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन, नितीश कुमार यांच्या सुशासनावर विश्वास ठेऊन आणि आमच्या घटक पक्षाला त्या ठिकाणी एनडीएच्या माध्यमातून प्रचंड मोठे बहुमत दिले आहे. २०१० चा सुद्धा रेकॉर्ड तुटू शकेल इतके बहुमत मिळाले आहे.**



### काँग्रेस एमआयएम पेक्षाही खाली गेली

**पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, दुसरे महत्त्वाचे असे आहे की या विजयानंतर खऱ्या अर्थाने काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांनी देशात जो विषारी प्रचार चालवला आहे, त्याला जनतेने उत्तर दिले आहे. सातत्याने संवैधानिक संस्थांचा अपमान करणे, जनतेच्या मॅनडेटला विरोध करणे, कुठेतरी जनतेला हे लक्षात येत आहे की आम्ही ज्या सरकारला निवडून देतो हा त्या सरकारचा अपमान नाही तर आमच्या मताचा अपमान आहे. काँग्रेस एमआयएम पेक्षाही खाली गेली आहे. मला असे वाटते की काँग्रेसचा बिहारच्या इतिहासात सर्वात कमी मत मिळाली आहेत.**

### बिहारचा मुख्यमंत्री कोण होणार?

बिहारच्या मुख्यमंत्री पदावर कोण येणार यावर प्रश्न विचारला असता देवेंद्र फडणवीस म्हणाले, नितीश कुमार यांच्या नेतृत्वात ही निवडणूक झाली आहे, आता मुख्यमंत्री पदासाठी आमचे वरिष्ठ नेते निर्णय घेतील. यात मला बोलण्याचा अधिकार नाही. अमित शहा यांनी देखील स्पष्टपणे सगळी भूमिका मांडली आहे. त्यामुळे मी त्यावर काही बोलू शकत नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

राहुल गांधी यांनी तिथे मतचोरी मुद्दा चालवला, त्यावर त्यांनी यात्रा काढली, नदीत उडी टाकली. पण लोकांचा विश्वास हा मोदींवर आणि नितीश कुमार यांच्यावर आहे. मला असे वाटते की जोपर्यंत काँग्रेस आणि त्यांच्यासोबतचे पक्ष जोपर्यंत आत्मपरीक्षण करत नाहीत तोपर्यंत ते निवडून येऊ शकत नाहीत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकास आणि सुशासन हाच प्रमुख मुद्दा ठरला आहे. आणि हे लक्षात येत होते की खूप चांगल्या परिस्थितीत एनडीए आहे. पूर्वीपेक्षा जास्त चांगली परिस्थिती यावेळी दिसून आली आहे. अक्षरशः त्याचा निकाल आज आपण पाहत आहोत. मला असे वाटत होते की आपण १६० च्या पुढे जाऊ, पण त्याही पेक्षा आपण पुढे गेलो आहोत. तसेच जोपर्यंत हे लोक सत्य पचवत नाहीत तोपर्यंत त्यांचा पराभव होत राहणार, असे म्हणत फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.महाराष्ट्र भूषण पुरस्कार संदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र भूषण पुरस्कार हा पुरस्कार राम सुतार जे अतिशय ज्येष्ठ शिल्पकार आहेत. देशभरात त्यांच्या एवढ्या मूर्ती कोणीच तयार केलेल्या नाहीत. त्यांनी १०० वर्ष वयाचे पूर्ण केले आहेत. आता लवकरच त्यांच्या घरी जाऊन आम्ही त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार त्यांना देणार आहोत, अशी माहिती फडणवीस यांनी दिली आहे.



## 'घर'च्या मायेसाठी धावली भारतीय जैन संघटना!

# श्रीकृष्ण वस्तीगृहात बालदिन उत्साहात, विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटले समाधानाचे हास्य

दैनिक वादळ वाता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

भारतीय जैन संघटनेच्या पुढाकाराने शहादा तालुक्यातील कानडी येथील वनवासी कल्याण आश्रम देवगिरी संचलित श्रीकृष्ण वस्तीगृहात बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कुटुंबापासून दूर असलेल्या या वनवासी विद्यार्थ्यांच्या जीवनात मायेचा आणि आनंदाचा क्षण आणण्यासाठी भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते संपूर्ण दिवस त्यांच्यासोबत राहिले.

भारतीय जैन संघटने च्या कार्यकर्त्यांनी वस्तीगृहातील बालकांची केवळ भेट



घेऊन औपचारिकता पूर्ण केली नाही, तर त्यांच्यासोबत भावनिक नाते जोडले. कार्यकर्त्यांनी मुलांशी संवाद साधत त्यांच्या अभ्यास, खेळ आणि दैनंदिन कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या अडचणी व समस्या अत्यंत आस्थेवाईकपणे जाणून घेतल्या. तसेच, त्यांना रोज लागणाऱ्या दैनंदिन आवश्यक वस्तू देऊन अल्पोपहाराचा आनंदही मुलांसोबत घेतला.

वस्तीगृहाचे छात्रावास प्रमुख ईश्वर राऊत यांच्यासह भारतीय जैन संघटनेचे जिल्हाअध्यक्ष अँडव्होकेट अल्पेश जैन, सहयोग सोशल ग्रुपचे उपाध्यक्ष डॉ. योगेश बडगुजर, कुशल जैन आणि चेतन धनका यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

सामाजिक सेवाभावी संघटना थेट आपल्या भेटीस आल्याने आणि संपूर्ण दिवस आपल्यासोबत घालवल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद आणि समाधान उमटला. 'घरच्या माणसांनी' केलेली विचारपूस आणि दिलेले प्रेम पाहून हे विद्यार्थी भारावून गेले. समाजाकडून मिळालेल्या या भावनिक आधाराबद्दल त्यांनी भारतीय जैन संघटनेचे खूप कौतुक केले.

## सकल मराठा परिवार आयोजित महारक्त दान शिबीरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाज बांधवांनी रक्तदान करावे-सौ.वर्षा मगर






दैनिक वादळ वार्ता

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

आपल्या भागातील परिसरातील समाज बांधवांना निमंत्रीत करण्यात येते की सकल मराठा परिवाराच्या वतीने महारक्तदान शिबीराचे आयोजन दिनांक १६ नोव्हबर रविवार रोजी पुणे जिल्ह्यातील विविध ठिकाणी करण्यात आले आहे तरी या महारक्तदान शिबीरास आपल्या भागातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे. रक्तदान हे जीवनदान आहे. आपण केलेल्या रक्तदानामुळे समाज बांधवांचे तसेच गरजू लोकांनचे प्राण वाचतील या मानवतेच्या भावनेतून निश्चितच जीवनदान मिळाले. म्हणून सर्वांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान करावे असे आवाहन कांतीकारी साथी च्या मुख्यसंपादक, आईसाहेब जिजाबाई सेवा संस्था, व जय महाराष्ट्र महिला संघटनेच्या अध्यक्षा सौ वर्षा मगर यांनी केले आहे.


## तळोदा येथे जननायक बिरसा मुंडा यांना जयंतीनिमित्त आदरांजली पारंपारिक ढोल नृत्याचे सादरीकरण

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त तळोदा येथील चिनोदा चौफुलीवर त्यांच्या पुतळ्या नजीक आदरांजलीचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व समाज बांधव तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते.सकाळी ठीक १० वाजून ३० मिनिटांनी स्थानिक लोकप्रतिनिधी आमदार राजेश पाडवी यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून जननायक बिरसा मुंडा यांना आदरांजली वाहिली.

या छोटेखानी कार्यक्रमात परिसरातील आदिवासी समाज बांधवांसह अनेक प्रमुख व्यक्ती उपस्थित होते, ज्यात आमदार राजेश पाडवी यांच्यासह माजी नगराध्यक्ष अजय परदेशी, माजी पंचायत समिती सभापती सतीष वळवी, आकाश



वळवी, माजी पंचायत समिती उपसभापती विजय राणा,माजी नगरसेवक जितेंद्र सूर्यवंशी, अॅडव्होकेअड अॅड अल्पेश जैन आणि परिसरातील अनेक गावांचे सरपंच व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा दिवस उत्सव म्हणून देखील साजरा करण्यात आला. यावेळी आदिवासी समाजाच्या वतीने पारंपारिक ढोल नृत्य देखील सादर करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# आजच्या मुला मुलींना चांगले संस्कार आणि योग्य दिशा देणे आपली जबाबदारी आहे-बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अरुणा असफअली महिला मंडळ बीड संचलित,संत तुकाराम प्राथमिक विद्यालय तेलगाव रोड, बीड या ठिकाणी पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती व बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी भूषवले तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री.आरकडे सर हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील शिक्षक श्री.जाधव सर यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले गर्कळ मॅडम,सोनके मॅडम, ढाकणे सर,मुंडे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याविषयी मार्गदर्शन केले तसेच ज्येष्ठ शिक्षक श्री.आरकडे सर यांनी यावेळी योग्य असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



केले.शेवटी अध्यक्षीय समारोप प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक बबनराव आंधळे सर यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले ते म्हणाले की स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू बद्दल सर्वच भारतीयांना आदर आहे. पंडित जवाहरलाल नेहरू यांना लहान लहान मुलं खूप आवडायची या मुलाबरोबर त्यांना गुलाबाची फुलेही आवडत असत म्हणून ते त्यांच्या कोटावर गुलाबाचे फुल लावत असत.त्यांचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ झाली उत्तर प्रदेशमधील प्रयागराज या ठिकाणी झाला त्यांचा जन्मदिन हा भारतामध्ये बालदिन म्हणून साजरा केला जातो देशांमध्ये धर्मनिरपेक्षतेची भावना रुजवण्याचे कार्य पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले देशाला पुढे नेण्यासाठी शिक्षणविज्ञान आणि विकासाची त्रिसूत्री त्यांनी अंमलात आणली या त्रिसूत्रीमुळेच देशांनी वैज्ञानिक प्रगती केली देशातील साक्षरता प्रचंड वाढली आणि विकासात देश अग्रेसर झाला पंडित जवाहरलाल नेहरू हे एक आदर्शवादी आणि वैचारिक प्रतीक होते त्यांचा असा विश्वास होता की जे आपले ध्येय तत्व आणि आदर्श विसरतात त्यांना यश मिळत नाही पंडित जवाहरलाल नेहरू हे असे राजकारणी होते ज्यांनी प्रत्येकाच्या जीवनावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकाश टाकला आहे एवढेच नाही तर पंडित नेहरूंना समाजवादी धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताकचे शिल्पकार ही मानले जात होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जाधव सर यांनी अगदी उत्कृष्टपणे केले यानंतर शेवटी शाळेचे शिक्षक मुंडे सर यांनी सर्वांचे आभार मानले व शेवटी शाळेतील बालकांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

संपादकीय

# बिबट्यांची दहशत



बिबट्यांच्या दहशतीने महाराष्ट्राचा अक्षरशः थरकाप उडाला आहे. ग्रामीण भागात संध्याकाळनंतर उघड्यावर वावरणं, रस्त्यातून चालत वा दुचाकीवरून जाणं किंवा शेतात काम करणं अशक्य झालं आहे. कालच बिबट्याने चारचाकीवरही हल्ला केला. बिबट्यांचा सर्वत्र सुळसुळाट झाला असून त्यांची पावलं आता ग्रामीण भागातून शहरातही पडू लागली आहेत. महाराष्ट्रातील ज्या शहरांचा विस्तार झाला आहे, त्या शहरांच्या कडेने जिथे अजूनही शेती केली जाते, अशा ठिकाणी राहणाऱ्यांच्या घरांच्या अंगणात बिबटे सर्रास आपल्या पंजांचे ठसे उमटवू लागले आहेत. कोकणात रानडुकरं, माकडं, तळकोकणात हत्तींनी उच्छाद मांडला आहे. मध्य महाराष्ट्रात मोरांनी शेतकऱ्यांच्या पेरण्याच गट्ट केल्याच्या तक्रारी आहेत. उत्तर, मध्य आणि दक्षिण महाराष्ट्रात बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. बिबट्यांचा हा प्रश्न क्वचित मराठवाडा आणि विदर्भातही दिसतो. पण, सह्याद्रीच्या रांगेत त्याने जेवढं विक्राळ रूप धारण केलं आहे, तेवढं तिथे नाही. साधारण दहा वर्षांपासून पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचा मुक्त वावर सुरू झाला. हरिश्चंद्रगडापासून कळसुबाईच्या पायथ्यापर्यंतच्या पट्ट्यात हा वापर सर्वात आधी जाणवू लागला. बिबट्यांनी शिवनेरीच्या पायाशी आपला रहिवास केल्यानंतर वन विभागाने जुन्नरला बिबट्यांसाठी तात्पुरती छावणी स्थापन केली. पुणे, अहिल्यानगर जिल्ह्यात पकडलेले बिबटे तिथे बंदिस्त केले गेले. त्यांच्यासाठी तिथे निकषानुसार पिंजरे, खानपान आदींची व्यवस्थाही केली गेली. तिथे 'बिबट सफारी' करण्यापासून अनेक योजना जाहीर केल्या गेल्या. बिबट्यांची व्यवस्था म्हणजे 'वाघ बचाव मोहिमे'चा भाग असल्यासारख्या अनेक रम्य कल्पना मांडल्या गेल्या. मानव आणि वन्यप्राण्यांच्या सहजीवनाबद्दल अनेक लेखही लिहिले गेले. हे लेखही मुख्यतः बिबट्यांची बाजू घेणारेच होते. पण, बिबट्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत गेल्याने बिबट्यांच्या बाजूने लिहिणाऱ्यांनी सध्या लेखण्या म्यान केलेल्या दिसतात. शेतकरी, ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे हाल पाहिल्यानंतर आता कोणीच निसर्ग प्रबोधन करण्याच्या मनःस्थितीत नाही.बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावराला माणूसच जबाबदार आहे, यात वाद नाही. पण, जे आज बिबट्यांचा त्रास सोसताहेत, ते त्याला जबाबदार नाहीत, हेही लक्षात घेतलं पाहिजे. चूक एकाची आणि शिक्षा भलत्यालाच असा हा प्रकार आहे. बिबट्यांची समस्या जटिल झाली आहे, ती मुख्यतः सह्याद्रीच्या पर्वतरांगांच्या पायथ्याशी. सह्याद्री सुस्थितीत राहिला, तरच महाराष्ट्राचं जीवन सुरक्षित राहील, असं तज्ज्ञ गेली ५० वर्षं सांगताहेत. सुमारे ४० वर्षांपूर्वी त्यासाठी 'पश्चिम घाट बचाव मोहीम'ही आखली गेली होती. ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ माधव गाडगीळ यांचा सह्याद्रीच्या जैवविविधतेला संरक्षित करण्यासंबंधीचा अहवालही आपल्या हाती होता. पण, गाडगीळ हे 'पर्यावरण अतिरेकी' असल्याची टीका करून त्यांचा तो अहवाल आपल्याकडून सोयीने बाजूला सारला गेला. सह्याद्रीचं जंगल, वनसंपदा 'विकासकामां'साठी खुली केली गेली. सह्याद्रीच्या निबिड अरण्यात, मोठमोठी यंत्रसामग्री आवाज करू लागली. खोदकामांनी त्यांनी सह्याद्रीची कूस रिकामी केली. तिथलं प्राणी जीवन याने आधी अस्वस्थ आणि मग अस्ताव्यस्त झालं. बिबट्या हिंस्र असल्याने त्याची चर्चा होते. पण, हरणं, मुंगूस, मांजरांसारखे अनेक प्राणी आपला वनातला अधिवास सोडून नाईलाजाने डोंगर सोडून खाली आले. मानवी वस्तीत, गावालगतच्या शेतांत त्यांनी स्वतःसाठी आसरा निवडला. काही वर्षांपूर्वी झालेली माळीण किंवा इर्शाळवाडीची दुर्घटना अशाच कारणांनी झाल्या होत्या. वाढती लोकसंख्या, शहरी जीवनापासून दूर जाऊन जंगलात 'फार्म हाऊस' करण्याची हौस, रिसॉर्ट, वॉटर पार्क यांसारख्या वेगवेगळ्या कारणाने महाराष्ट्रात मुळात वनजमिनींचं अधिग्रहण वाढलं आहे. सरकारी विभाग आपल्या विकासकामांसाठी वन जमिनीची मागणी करतात. ते त्या बदल्यात झाडं लावण्याचं कागदोपत्री मान्यही करतात. पण, प्रत्यक्षात अशी यशस्वी वृक्ष लागवड कुठेच होत नाही. नवे रस्ते बांधताना किंवा अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्या रुंदीकरणात झाडांची जेवढी कत्तल होते, त्यांचं ना पुनर्रोपण होत, ना कोणी नवी झाडं लावतं!महाराष्ट्राच्या वनसंपत्तीचं झालेलं उद्ध्वस्तीकरण आपल्याला बिबट्यांच्या मानवी वस्तीतील वावरातून दिसतं आहे. दुर्दैवाने हे ना कोणी सांगतं आहे, ना कोणी कबूल करतं आहे. बिबट्यांच्या बंदोबस्तासाठी अनेक उपाय आहेत. त्यातल्या कोणत्या ना कोणत्या उपायांनी मानवी वस्तीतले बिबटे नष्ट करता येतील! पण त्यामागे जी वन्य जीवसाखळी आहे; ती उद्ध्वस्त होते आहे, त्याचं काय? हा निसर्गवादी दृष्टिकोन नाही. माणसाच्या जगण्याचं इंगितच या निसर्गात आहे. सिमेंटीकरणाच्या हव्यासापोटी, किरकोळ हितसंबंधांसाठी आपण हजारो वर्षांची जीव साखळी उद्ध्वस्त करतो आहोत, म्हणजे दूरवर माणसाचा श्वासच तोडतो आहोत, ही जाणीवच कुठे दिसत नाही. डोंगरदऱ्यातून बाहेर पडलेल्या बिबट्यांना पुणे - अहिल्यानगर - नाशिक पट्ट्यातील उसाच्या शेतांत आसरा घेणं सोपं होतं. बिबट्यांची बाळंतपणंही या उसात झाली आणि त्यामुळे त्यांची संख्याही भरमसाट वाढली. 'एआय'चा वापर करून मांजराला घाबरून बिबट्या पळाला किंवा माणसाने शौर्याने त्याचा मुकाबला केल्याच्या नकली 'रील' तयार करणं सोपं आहे. एखाद् दुसऱ्या ठिकाणी असं घडलंही असेल. पण, अपवाद म्हणजे नियम नाही. महाराष्ट्राचा ग्रामीण भाग सध्या केवळ भयभीतच नाही, मुलाबाळांच्या काळजीने अस्वस्थ आहे. सरकारने याची गंभीर दखल घेऊन तातडीची उपाययोजना म्हणून बिबट्यांच्या नसबंदीची धडक मोहीम राबवण्याचे आदेश वनविभागाला दिले पाहिजेत. दुसऱ्या बाजूला वनसंपदेचा गंभीर विचार करून त्यासंबंधीचं स्वतंत्र नवं धोरण जाहीर केलं पाहिजे. महाराष्ट्राच्या समृद्धीची वाट वनसंपदेच्या समृद्धतेतूनच आहे, याची जाणीव त्या धोरणात दिसली पाहिजे. त्यातून संरक्षणही होईल आणि अनेक समस्याही सुटतील.

# खासदार सांस्कृतिक महोत्सव ठरतो आहे प्रमुख आकर्षण




एखाद्या परिसरातील लोकनेता जर कल्पक असला, तर त्या परिसराचा सर्वांगीण विकास होऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय उपपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी. २०१४ मध्ये गडकरी नागपूरचे खासदार झाले आणि त्यांनी इतर विकासकामांसोबत नागपुरात खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजित करायला सुरुवात केली. यंदा हा खासदार सांस्कृतिक महोत्सव ८ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झाला असून १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. नागपूरच्या ईश्वर देशमुख क्रीडा महाविद्यालयाच्या प्रचंड मोठ्या मैदानावर हा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणेच यंदा देखील आयोजित करण्यात आला आहे.

८ नोव्हेंबरला या खासदार सांस्कृतिक महोत्सवाचा उद्घाटन सोहळा थाटामाटात पार पडला. यावेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. याशिवाय आयोजक केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, चाणक्य मालिकेच्या माध्यमातून भारतीय संस्कृती घरोघरी पोहोचवणारे लेखक दिग्दर्शक डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी, राज्यमंत्री आशीष जयस्वाल असे सर्वच मान्यवर उपस्थित होते. मनुष्याचे जीवन उत्सवमय असावे असे भारतीय परंपरेचे विधान आहे. उत्सव हे आनंदाची अभिव्यक्ती असतात. परब्रह्म तत्त्व स्वरूप हे देखील आनंद स्वरूपच आहे. आपल्या परंपरेचे विश्वाच्या मूळ तत्त्वातही आनंद मानले आहे. परंतु रोजीरोटीच्या यांत्रिक जगात त्याला हरवून बसलो आहोत. त्यामुळे मनुष्याने अंतर्मनात डोकावून आनंदाची अभिव्यक्ती जागृत राहण्यासाठी अशा महोत्सवांची आवश्यकता आहे असे प्रतिपादन स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी यावेळी केले. खासदार महोत्सव हा संस्कार यज्ञ आहे असे प्रतिपादन नितीन गडकरी यांनी केले, तर कलेशिवाय ईश्वरही अपूर्ण आहे, त्यामुळे ईश्वराच्या भक्तीबरोबरच कलेची साधना ही देखील महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन डॉ. चंद्रप्रकाश द्विवेदी यांनी यावेळी केले. उद्घाटन समारोहानंतर प्रसिद्ध अभिनेते अशुतोष राणा यांची प्रमुख भूमिका असलेले नाटक हमारे रामची प्रस्तुती करण्यात आली. यावेळी उपस्थित हजारो नागरिकांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला. दुसऱ्या दिवशी ८ नोव्हेंबरला विशाल मिश्रांच्या सुमधुर गीतांनी नागपूरकर अक्षरशः बेधुंद झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आवर्जून कार्यक्रमात उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी नागपुरात होत असलेला सांस्कृतिक महोत्सव हा नागपूरकरांसाठी अनमोल उपहार असल्याचे मत व्यक्त केले. या आयोजनासाठी त्यांनी नितीन गडकरी यांचे अभिनंदन केले. यावेळी बोलताना पुढे असे कार्यक्रम आयोजित करायचे असतील तर नागपुरात एक लाख क्षमतेचे स्टेडियम उभारले जावेत अशी अपेक्षा नितीन गडकरी यांनी बोलताना व्यक्त केली.

खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सकाळच्या वेळी गडकरी जागर भक्तीचा या शीर्षकाखाली विविध अध्यात्मिक कार्यक्रमांचे देखील आयोजन करतात. दुसऱ्या दिवशी म्हणजेच ९ नोव्हेंबरला सकाळी नागपुरातील विविध शाळांमधील ५३ हजार विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे याच मैदानावर उभे राहून सामूहिक गीता पठण केले. हा सामूहिक गीता पठणाचा विश्वविक्रम असल्याचे गडकरी यावेळी म्हणाले. तिसऱ्या दिवशी म्हणजे १० नोव्हेंबरला सकाळी याच मैदानावर हजारो विद्यार्थ्यांनी एकत्र येत सामूहिक रामरक्षा आणि मारुती स्तोत्र पठण केले. यावेळी संस्कार भारतीच्या विदर्भ प्रदेश अध्यक्ष कांचन गडकरी भगवताचार्य स्वामी सूर्य नंदजी महाराज स्वामी सूर्यानंद महाराज विश्व हिंदू परिषदेचे निलोत्पाल गुप्ता उपस्थित होते. संध्याकाळी प्रख्यात कलावंतांच्या वाद्यांचे वाद्य फ्युजन सादर करण्यात आले. यावेळी प्रख्यात बासरी वादक रोणू मुजुमदार, गौतम शर्मा ड्रम वादक, निलेश मोरे संगीतकार, अतुल रनिंगा बेस गिटार वादक, मनीष कुलकर्णी सितार वादक, स्वीकार कट्टी व्हायोलिन वादक, मैसूर मंजुनाथ विक्रम घोष यांनी पॉप आणि रॉक तबलावादन आणि तौफिक कुरेशी यांची तालवाद्य यांची अनोखी जुगलबंदी रसिकांना अनुभवायला मिळाली. सोमवार हा भगवान शिवाचा वार त्यामुळे सोमवारी सकाळी ईश्वर देशमुख महाविद्यालयाच्या प्रांगणात शिवमहिमाचे धीर गंभीर स्वर जनसामान्यांना ऐकायला मिळाले. कण्वाश्रमाच्या भगिनींच्या सुरात सूर मिसळत शेकडोंच्या उपस्थितीत महिला आणि पुरुषांनी एका सुरात स्तोत्रपठण केले. शेवटी शिवशंकराची आरती देखील करण्यात आली. यावेळी देखील मान्यवर मोठ्या संख्येत उपस्थित होते. संध्याकाळी राष्ट्रसंतांची जीवनगाथा हे महानाट्य सादर करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या महानाट्यात जवळजवळ बाराशे कलावंत सहभागी झाले होते. उपस्थित आणि मोठ्या संख्येत या कार्यक्रमाचा आनंद लुटला.

मंगळवार हा श्री गणेशाचा वार म्हणून मानला जातो. त्यानिमित्ताने मंगळवारी सकाळी बुद्धीचे आराध्य दैवत श्री गणेशाची आराधना करणाऱ्या गणपती अथर्वशीर्षाची २१ आवर्तने या मैदानात करण्यात आली. यावेळी संस्कार भारतीच्या विदर्भ प्रदेश अध्यक्ष कांचन गडकरी खासदार, खासदार सांस्कृतिक महोत्सवाचे अध्यक्ष अनिल सोले, राष्ट्रसेविका समितीच्या मनीषा संत उपस्थित होते. संध्याकाळी याच मैदानात महाराष्ट्राची हास्य जत्रा या दूरदर्शन वाहिनीवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमातील कलावंतांनी उपस्थित नागरिकांना हसवले. अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि सई ताम्हणकर यांनी वऱ्हाडी भाषेत आपल्या संचालनाचा प्रारंभ केला. यावेळी नितीन गडकरी, कांचन गडकरी, माहिती आयुक्त गजानन निमदेव, पत्रकार श्रीपाद अपराजित असे मान्यवर उपस्थित होते. बुधवारी सकाळी हरिपाठ पठणाने जागर भक्तीचा हा कार्यक्रम जागवला गेला. हजारो नागरिकांनी त्यात सहभाग नोंदवला. संध्याकाळी अखिल सचदेवने आपल्या सुरेल गाण्यांच्या तालावर उपस्थित तरुणाईला अक्षरशः थिरकवले.चार दिवसांपूर्वीच आपल्याला कन्यारत्न प्राप्त झाले. त्यानंतरचा माझा पहिला जाहीर कार्यक्रम आहे. त्यामुळे हा कार्यक्रम मी मुलीला समर्पित करीत आहे असे अखिल सचदेवाने यावेळी जाहीर केले. गुरुवार हा शेगावचे संत श्री गजानन महाराज यांचा दिवस मानला जातो. त्यामुळे जागर भक्तीचा या कार्यक्रमात सकाळी हजारो नागरिकांनी श्री विजय ग्रंथातील एकविसाव्या अध्यायाचे सामूहिक पारायण केले. संध्याकाळी संस्कार भारतीने सादर केलेल्या मिट्टी के रंग या कार्यक्रमात अकराशे स्थानिक कलावंत सहभागी झाले होते. स्थानिक कलावंतांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला हवे असे प्रतिपादन नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना केले. शुक्रवारी सकाळी सामूहिक विष्णुसहस्रनामाचे पठण करण्यात आले. यावेळी हजारो नागरिकांनी त्यात सहभाग नोंदवला.आज म्हणजे शनिवारी खासदार सांस्कृतिक महोत्सवात कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून रविवारी १६ नोव्हेंबर रोजी श्रेया घोषाल यांची लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित करण्यात आली आहे. १७ नोव्हेंबर रोजी शंकर महादेवन यांनी गायलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सांघिक गीतांचा कार्यक्रम सादर होणार आहे, तर १८ नोव्हेंबरला अजय अतुल यांच्या लाईव्ह कॉन्सर्ट कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून खासदार सांस्कृतिक महोत्सव हे नागपूरचे एक प्रमुख आकर्षण बनलेले आहे असे म्हटले तरी वावगे ठरू नये. या कार्यक्रमाला स्थानिक नागरिक तर मोठ्या संख्येत हजेरी लावतातच. मात्र बाहेरच्या नागरिकांसाठी एक प्रमुख आकर्षण ठरला आहे.

# मराठवाड्यात हुडहुडी वाढली...!



छत्रपती संभाजीनगर, जालना, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव या जिल्ह्यांत थंडीचे प्रमाण वाढले आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी झाल्यानंतर त्याचे परिणाम महाराष्ट्रात दिसू लागतात. त्याचप्रमाणे मराठवाड्यातदेखील चांगलीच हुडहुडी भरली आहे. बहुतांश ठिकाणी आता हवेत चांगलाच गारठा जाणवू लागला आहे.

राज्यात पावसाने विश्रांती घेतल्यानंतर थंडीचे जोरदार आगमन झाले आहे. राज्यात अनेक ठिकाणी हुडहुडी वाढली आहे. उत्तरेकडील शीत वाऱ्यांमुळे उत्तर महाराष्ट्रात थंडीची लाट कायम आहे. राज्याच्या किमान तापमानात २ ते ८ अंशांची मोठी घट झाल्याने हुडहुडी वाढली आहे. राज्यातील हवामान मुख्यतः कोरडे राहणार आहे. उत्तरेकडे थंडी कायम राहण्याची तर दक्षिणेकडे किमान तापमानात काही अंशी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मराठवाडा व विदर्भात तापमानात चांगलीच घट झाली आहे. मराठवाडा व विदर्भाची सीमा एकमेकांच्या लगत आहेत. यंदा विदर्भाच्या तुलनेत मराठवाड्यात जास्त थंडी जाणवत आहे. या पाठोपाठ पश्चिम महाराष्ट्रात थंडी सौम्य आहे. कोकणाच्या तुलनेने यंदा पश्चिम महाराष्ट्रातील थंडी कमी जाणवत आहे, असे त्या भागात राहणाऱ्या मराठवाड्यातील नागरिकांच्या प्रतिक्रिया आहेत. या आठवड्यात पुणे, मुंबई, नाशिक, सातारा या भागात किमान तापमान १२ ते १६ अंश सेल्सीएसच्या दरम्यान नोंदविण्यात आले. हवामान विभागाने देखील मराठवाड्यातील काही जिल्ह्याच्या बाबतीत अलर्ट जाहीर केला आहे. मराठवाड्यात आठ जिल्हे आहेत. त्यापैकी परभणी जिल्ह्यात नेहमीच उष्णता व थंडीचे प्रमाणही जास्त असते. राज्यात तापमानात घसरण झाल्याने महाबळेश्वरसारखी थंडी जळगावमध्ये अनुभवास येत आहे. मागच्या वर्षी हिवाळा ऋतूत सुरुवातीलाच मराठवाड्यातील परभणी येथे पारा चांगलाच घसरला होता; परंतु सध्या जळगावचे तापमान १० अंश सेल्सीएसवर आले आहे. उत्तर भारतात गारठा वाढल्याने त्याचा परिणाम मराठवाड्यात चांगलाच दिसून येत आहे. आता येत्या काही दिवसांत मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत अशाच प्रकारे थंडी वाढणार आहे. उत्तर भारतात बर्फवृष्टी होत असल्याने महाराष्ट्रातील हवामान बदलण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई तसेच कोकणात दरवर्षीपेक्षा कमी थंडी राहण्याचा अंदाज हवामान खात्यातर्फे व्यक्त करण्यात आला आहे.

सातारा, महाबळेश्वर या भागात १६ अंश सेल्सीएसपेक्षा कमी तापमानाची नोंद करण्यात आली. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी या तीन जिल्ह्यांत किमान तापमानाची नोंद करण्यात आली. याबरोबरच नांदेड, हिंगोली, धाराशिव, बीड, लातूर या ठिकाणीही थंडीचा जोर वाढला आहे. मराठवाड्यात १३ अंश सेल्सीएसपर्यंत तापमानाची नोंद करण्यात आली. नाशिकचा पारा १२ अंश सेल्सीएसवर आला आहे. पुण्यात नेहमीच थंडगार वातावरण असते. त्या ठिकाणी तापमानाची नोंद १६ अंश सेल्सीएस एवढी नोंदविण्यात आली. असाच काहीसा अनुभव मराठवाड्यात जाणवत आहे. उत्तर भारतातील हवामान जोपर्यंत स्थिर होणार नाही, तोपर्यंत मराठवाड्यातील वातावरणात असाच गारवा राहील, असे हवामान खात्यातर्फे कळविण्यात आले आहे. मराठवाड्यातील वातावरणात बदल दिसून आल्यानंतर सर्दी, ताप, खोकला हे आजार दिसून येत आहेत. लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांना सर्दी व खोकल्याचा आजार झाल्याचे दिसून येत आहे. मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात ग्रामीण भागातही थंडीचा जोर वाढल्याने शेकोट्या पेटविल्या जात आहेत. मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यातील शेतात असलेले पीक काढण्यात आल्यानंतर शेतकरी थोडासा निवांत झाला आहे. यंदा मराठवाड्यात सर्वत्रच अतिवृष्टी झाल्याने अनेक शेतकऱ्यांच्या हातातील पिके वाया गेली. यंदा पावसाळा मोठा होता. त्यामुळे थंडी देखील जास्त राहील असा अंदाज मराठवाड्यातील वयोवृद्ध व जाणकार लोकांकडून काढण्यात आला होता. मराठवाड्यातील ग्रामीण भागात ऋतुचक्र बदलले असल्याने शेतात पीक घेत असताना शेतकऱ्यांची दमछाक होत आहे. मराठवाड्यात आता तर थंडीचा जोर वाढल्याने अशा रब्बीच्या वातावरणात कुठली पिके घ्यावीत, याबाबत शेतकरी देखील मार्गदर्शन घेत आहेत. उत्तर भारतातील वातावरणावर मराठवाड्यात होत असलेल्या वातावरणातील बदल लक्षात घेतला जातो. मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होणार आहेत. ऐन थंडी काळात निवडणुका होणार असल्याने या वातावरणाचा प्रचार, सभा, निवडणूक, मतदान, मतमोजणी यावर नक्कीच परिणाम होणार आहे. एकीकडे वातावरणातील गारवा व दुसरीकडे राजकारणातील गर्मी असे चित्र काही दिवसांत मराठवाड्यातील ग्रामीण भागात पाहावयास मिळणार आहे.दरम्यान हुडहुडी वाढल्याने आरोग्यविषयक प्रश्न देखील निर्माण होत आहेत. थंडीच्या काळात ज्येष्ठ नागरिकांना विशेष काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागातर्फे करण्यात आले आहे. थंडीच्या या काळात हातमोजे, स्वेटर, मफलर, कानपट्टीचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. अनेकांनी कपाटात बंद केलेले हे सर्व साहित्य बाहेर काढले आहे. यंदा थंडी दरवर्षीपेक्षा जास्तच राहणार आहे. त्यामुळे थंडीच्या लाटा लक्षात घेऊन घराबाहेर पडताना काळजी घ्यावी, असे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले आहे. सकाळी दररोज पायपीट करणारी मंडळी देखील थंडीमुळे उशिरा घराबाहेर पडत आहेत. एकंदरित ही थंडी वाढतच जाणार असल्याने सकाळी १५ अंश सेल्सीएसपेक्षा जास्त तापमान झाल्यानंतरच घराबाहेर पडणे आरोग्याच्या दृष्टीने योग्य राहील, असा सल्ला डॉक्टर मंडळींकडून दिला जात आहे. शेवटी प्रत्येकाच्या आरोग्यावर थंडीचा वेगवेगळा परिणाम होत असतो. त्यामुळे डॉक्टरांचा सल्ला तसेच शरीराला मानवणारी थंडी याचा विचार करूनच प्रत्येकाने घराबाहेर पडावे, असेही आरोग्य विभागाच्यावतीने सांगण्यात येत आहे. दरम्यान मराठवाड्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत किमान उष्णतेचा पारा नसल्याचा फायदा प्रचारासाठी नक्कीच होणार आहे. पावसाळा व अति उष्ण उन्हाळा या दोन ऋतूत प्रचार करणे थोडेसे किचकट असते; परंतु या दोन ऋतू व्यतिरिक्त हिवाळ्यामध्ये मात्र उमेदवारांना प्रचारात तेवढी अडचण येत नाही. यामुळे यंदाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रंगतदार तसेच उमेदवारांना विकासासाठी उष्णता देणारे ठरो, असेच यानिमित्ताने म्हणता येईल.

# गणिताचे ‘भीष्म पितामह’ आणि दोन विद्यापीठांचे कुलगुरू डॉ. निमसे यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव



दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे यांनी शैक्षणिक क्षेत्रात दिशा देण्याचे काम केले. गणित या अवघड विषयात योगदान दिले. पुणे विद्यापीठाची जबाबदारी सांभाळताना उत्तमपणे काम केले. नांदेड येथे कुलगुरू असताना त्यांनी उत्तमपणे जबाबदारी पार पडली. नामविस्तारावरून वाद झालेला असताना त्यांनी सर्वांशी समन्वय साधून यशस्वी मार्ग काढला. शिक्षण क्षेत्रातून त्यांनी समाजाची सेवा केली. समावेशक, दूरदृष्टी असलेल्या अशा व्यक्तिमत्त्वाची समाजाला गरज गरज असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री ना. शरद पवार यांनी केले. कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे अमृत महोत्सव गौरव समिती, गणित विभाग माजी विद्यार्थी संघ व न्यू आर्टस कॉमर्स एड सायन्स महाविद्यालयाच्या वतीने शुक्रवारी शिक्षण क्षेत्रात ४४ वर्ष प्रदीर्घ योगदान देणारे माजी कुलगुरू, ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. सर्जेराव निमसे यांच्या अमृत महोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ना. शरद पवार बोलत होते. रेल्वे स्टेशन रोडवरील सहकार सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.एन. के. ठाकरे उपस्थित होते. याप्रसंगी खासदार निलेश लंके, पद्मश्री पोपट पवार, डॉ. जब्बार बगदाद (इराक), ड. विश्वासराव आठरे, माजी कुलगुरु डॉ. अशोक कोळकर, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ.एस.एन. पठाण, डॉ. वासुदेव गाडे, डॉ. उध्दव भोसले, कुलगुरु डॉ. जयंत वैशंपायन, डॉ. अरविंद दीक्षित, डॉ. उपेंद्र द्विवेदी, डॉ. मनोहर चासकर, डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कॅनडा येथील डॉ. निंगराज, इराक येथील डॉ जब्बार.ज्येष्ठ नेते दादाभाऊ कळमकर, उद्योजक अरविंद पारगावकर, पराग काळकर, माजी महापौर अभिषेक कळमकर, ड. विद्याधर काकडे, रावसाहेब वर्पे, डॉ विवेक भापकर , जयंतराव वाघ, मुकेश मुळे आदींसह आजी-माजी कुलगुरु, माजी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षणतज्ञ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले की, हा निमसे यांच्या वाढदिवसाचा नव्हे तर चार दशकांहून अधिक काळ चाललेल्या त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव सोहळा आहे. निमसे हे सामाजिक जाणिवांचे, शिस्तप्रिय आणि अडचणींच्या काळातही विद्यापीठांना सक्षमपणे दिशा देणारे मार्गदर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.या सोहळ्यात डॉ. सर्जेराव निमसे यांच्या जीवनकार्याचा वेध घेणारा प्रा. गणेश भगत संपादित कुलगुरू गौरव ग्रंथ तसेच डॉ. सर्जेराव निमसे व प्रा. गणेश भगत संपादित शैक्षणिक ग्रंथ शिक्षण आणि विकास या दोन ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ना. शरद पवार यांच्या हस्ते माजी कुलगुरु यांचा सपत्निक गौरव करण्यात आला. गौरव मानपत्राचे वाचन प्रा. गणेश भगत यांनी केले. जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था व यशवंतराव चव्हाण व्यासपीठच्या वतीने देखील त्यांना सन्मान करण्यात आला. संपूर्ण सभागृहाने टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना मानवंदना दिली. या सोहळ्यास देशभरातील आजी-माजी २० कुलगुरुंची उपस्थिती होती.माजी कुलगुरू निमसे यांचे पुतणे न्यायधीश श्रीकांत निमसे यांनी कौटुंबिक जीवनातील त्यांचे योगदान स्पष्ट केले. निमसे परिवाराच्या वतीने नांदेड विद्यापीठाला गणित विभागासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे व त्याद्वारे प्रा. निमसे यांच्या नावाने गोल्ड मेडल देण्याचा प्रस्ताव असल्याचे सांगितले. शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांचा शुभेच्छा संदेश व्हिडिओद्वारे दाखवण्यात आला.माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी माजी कुलगुरु यांच्याबद्दल भावना विशद केल्या. डॉ. जब्बार बगदाद यांनी निमसे यांच्या मित्रत्वाचे व शैक्षणिक क्षेत्रातील अनुभव विशद केले. डॉ. जयवंत वैशंपायन यांनी कुलगुरू असताना कसे काम करावे? हे निमसे यांनी त्यांच्या कार्यातून दाखवल्याचे सांगितले. भारतकुमार आहुजा यांनी तपस्वी गुरू असलेले निमसे हे गणित विषयाचे भीष्म पितामह असल्याचे स्पष्ट केले.डॉ. वासुदेव गाडे म्हणाले की, माजी कुलगुरु निमसे यांनी पुणे विद्यापीठ सायन्स विभागाचा विकास केला. विज्ञान विभागाला त्यांनी न्याय देण्याचे काम केले. त्यांच्या अनुभवाचा फायदा शैक्षणिक संस्थांना होणार असल्याचे सांगितले. डॉ. माणिकराव साळुंके यांनी कुलगुरू असताना व्याख्यान घेणारे ते एकमेव कुलगुरु होते. कोरोनानंतर शिक्षणाची परिस्थिती वाईट झाली असून, यासाठी त्यांचा अनुभव इतर विद्यापीठांना मार्गदर्शक ठरेल. डॉ. अरविंद दीक्षित यांनी हा कुलगुरुंचे संमेलन भरल्याचा अनुभव सांगितला. विश्वासराव आठरे पाटील यांनी माजी कुलगुरु निमसे यांच्यामुळे जिल्ह्याचे नाव भारतभर गेला. त्यांच्या कार्यकाळात न्यू आर्टस कॉमर्स एड सायन्स महाविद्यालयाने प्रगती साधल्याचे सांगितले. डॉ. मनोज दीक्षित यांनी निमसे यांच्या मार्गदर्शनाने कुलगुरूंची संधी मिळाल्याचे कबुल केले.सत्काराला उत्तर देताना माजी कुलगुरु सर्जेराव निमसे म्हणाले की, माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाने हा गौरव सोहळा साजरा होत आहे. शैक्षणिक कौटुंबिक जीवनाच्या वाटचालीवर त्यांनी प्रकाश टाकला. ते पुढे म्हणाले की, जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत ३३ वर्षे काम करताना स्वत:चा सर्वांगीन विकास झाला. ही संस्था आयुष्यातील प्रयोगशाळा ठरली. कुलगुरु म्हणून काम करताना हा अनुभवाची शिदोरी महत्त्वाची ठरली. नांदेडला कुलगुरू असताना शैक्षणिक उपक्रम राबवून साडेचारशे असलेले विद्यार्थी संख्या ३००० पर्यंत नेली. लखनऊ विद्यापीठाला शिस्त लावली. १८९० नंतर पहिल्यांदा २५ कोटीची इमारत सीएसआर फंडातून उभारली. या कार्यातून समाधान मिळाले. न थांबता गणिती संदर्भात संशोधन व शैक्षणिक कार्य सुरु राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. आभार मुकेश (दादा) मुळे यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमृत महोत्सव गौरव समिती व माजी विद्यार्थी संघाने परिश्रम घेतले.

# तळोदा-बोरद परिसरातील ऊसतोडणी संकटात

## प्रवाहित नदी-नाल्यांमुळे नोव्हेंबरमध्येही ऊसतोड थांबली; रब्बी हंगाम धोक्यात

**नंदुरबार । दिपक गोसावी**

यावर्षी बोरद परिसरात उसाची विक्रमी लागवड झाली असली तरी, सध्या नोव्हेंबर महिना अर्धा उलटूनही तळोदा ते बोरद पट्ट्यातील शेतकऱ्यांची ऊसतोडणी थांबली आहे. आमलाड, मोरवड, चौगाव, कढेल आणि बोरद परिसरातील नदी-नाले अजूनही प्रवाहित असल्याने, शेतात ऊस वाहतूक करणारी मोठी वाहने पोहोचू शकत नाहीत. या नैसर्गिक आपत्तीमुळे परिसरातील शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. तळोदा परिसरातील अनेक शेतजमिनी नदी आणि नाल्यांना लागून आहेत. या शेतांपर्यंत पोहोचण्यासाठी पाणी पार करावे लागते. नोव्हेंबरमध्येही नदी-नाल्यांचा प्रवाह कायम असल्याने ऊसतोडणीसाठी लागणारे मोठे ट्रॅक्टर आणि ट्रॉल्या शेतात जाऊ शकत नाहीत. यामुळे रस्त्यालगत असलेल्या शेतकऱ्यांची तोडणी सुरू असली तरी, नदीकिनारी असलेले ऊसधारक शेतकरी अद्याप वंचित आहेत.



**या गंभीर परिस्थितीवर मात करण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे मदतीची मागणी केली आहे.नदी-नाल्यांवर तात्पुरता मार्ग किंवा पुलाची सोय तातडीने उपलब्ध करून द्यावी. कारखान्यांनीही शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत वाहने पोहोचवण्याचे प्रयत्न करावेत, अन्यथा ऊस शेतातच राहून मोठे आर्थिक नुकसान होईल, अशी विनंती बोरद परिसरातील एका शेतकऱ्याने केली आहे.**

चालू वर्षात थंडीचे प्रमाण चांगले असल्याने गहू आणि हरभऱ्याचे चांगले उत्पादन मिळण्याची शक्यता कृषी तज्ज्ञांनी वर्तवली आहे. मात्र, वेळेवर ऊसतोड झाली नाही तर शेत रिकामे होणार नाही. जर डिसेंबरमध्येही नाले प्रवाहित राहिले, तर शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील गहू किंवा हरभऱ्याची पेरणी वेळेत करता येणार नाही. याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणार आहे. एका नैसर्गिक संकटामुळे ऊस आणि रब्बी असे दोन्ही हंगाम शेतकऱ्यांच्या हातून जाण्याची भीती निर्माण झाली आहे.कृषी विभाग आणि प्रशासनाने या नैसर्गिक अडथळ्यावर तातडीने उपाययोजना करून शेतकऱ्यांची ऊसतोडणी वेळेत पूर्ण करावी, जेणेकरून त्यांना रब्बी हंगामाची तयारी करता येईल.

# वढोलीत सोलर प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

दैनिक वादळ वार्ता
**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यातील वढोली येथे जलपुरवठा योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या ४० घथझ क्षमतेच्या सोलरॉयझेशन प्रकल्पाची पाहणी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दि.१२ बुधवारी केली. या प्रकल्पामुळे गावाच्या पाणीपुरवठा योजनेला ऊर्जा बचत आणि पर्यावरणपूरक स्थैर्य लाभणार आहे. वाढत्या वीजदरांमुळे ग्रामपंचायतींना पाणीपुरवठा योजनांचे संचालन करणे खर्चिक ठरत होते. या पार्श्वभूमीवर शासनाच्या सोलरॉयझेशन उपक्रमांतर्गत वढोली जलपुरवठा योजनेवर ४० घथझ क्षमतेचा सौर प्रकल्प उभारण्यात आला आहे.या माध्यमातून वीजेवरील अवलंबित्व कमी होऊन,पंप हाऊस व फिल्टर प्लांटला अखंड आणि स्वस्त ऊर्जा उपलब्ध होणार आहे. जिल्हाधिकारी यांनी पाहणीदरम्यान प्रकल्पाची कार्यपद्धती,कार्यक्षमता आणि देखभाल व्यवस्थेबाबत माहिती घेतली. संबंधित अधिकाऱ्यांना प्रकल्प नियमित कार्यरत ठेवण्यासाठी योग्य नियोजन आणि देखभाल करावी,तसेच ग्रामपंचायतींनी या माध्यमातून बचत झालेला निधी गावाच्या इतर विकासकामांसाठी वापरावा,अशा सूचना दिल्या. या वेळी उपविभागीय अधिकारी एल तिवारी,तहसीलदार शुभम बहाकर, बीडिओ संजय पुप्पलवार,ग्रामसेवक अनिल हरमवार,सरपंच देवाडे,सदस्य संदीप पोरकर,सुरेंद्र मडपल्लीवार, नायब तहसीलदार शेखर वेटे, तलाठी अश्विनी शेळके यांची उपस्थित होती.ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या भेटीबद्दल समाधान व्यक्त करत, या प्रकल्पामुळे गावाला दीर्घकालीन फायदा होईल, अशी प्रतिक्रिया दिली.सौरऊर्जेच्या माध्यमातून वीजबचत आणि पर्यावरण संरक्षणाचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून वढोली सोलर थढझ प्रकल्प उभा राहत असून, तो इतर गावांसाठी आदर्श ठरण्याची शक्यता आहे.

## अखेर श्रीकांत पोरेडडीवार यांचा काँग्रेसला रामराम!

# राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



नगरपरिषद निवडणुका समीप आल्याने मुल शहरातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत चालले आहे. विविध पक्षांमध्ये नेते, कार्यकर्त्यांच्या प्रवेश-निर्गमनाची मालिका सुरू असून नुकताच आणखी एक महत्वाचा प्रवेश पार पडला आहे.

श्रीकांत पोरेडडीवार यांनी काँग्रेस पक्षाला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष नितीन भटारकर यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला.

राजकारणी म्हणून नव्हे तर आपल्या प्रभागातील नागरिकांसाठी नेहमी तत्पर राहणारा, लोकांशी सलोख्याने वागणारा आणि समाजातील सर्व स्तरांशी आपुलकीचे नाते जोडणारा कार्यकर्ता अशी श्रीकांत पोरेडडीवार यांची ओळख आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवचैतन्य लाभले असल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले. काही दिवसांपूर्वीच भाजपाचे नगरसेवक प्रशांत समर्थ यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करून चर्चेला सुरुवात केली होती. आता श्रीकांत पोरेडडीवार यांच्या पक्षबदलामुळे मुल शहरातील राजकीय समीकरणात नवे घडामोडींचे वारे वाहू लागले आहेत.

# ठाकरेंचा सेवक तोच मुंबईचा नगरसेवक बॅनर तत्काळ काढा राज ठाकरेंचा आदेश

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**







शिवाजी पार्क परिसरात काही दिवसांपूर्वी एक बॅनर लावण्यात आला. ठाकरेंचा सेवक, तोच मुंबईचा नगरसेवक असा मजकूर असलेला तो बॅनर चर्चेचा मोठा विषय ठरला. विशेष म्हणजे, हा बॅनर लावला होता कुर्ल्यातील मनसैनिक लक्की वामन कर्डक यांनी. पण बॅनरमध्ये वापरलेला ठाकरेंचा सेवक हा शब्द मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांना अजिबात रुचला नाही. राज ठाकरे यांनी तात्काळ मनसेच्या मुंबई शहर उपाध्यक्ष यशवंत किल्लेदार यांना फोन करून या बॅनरबाबत नाराजी व्यक्त केली आणि आदेश दिले हे पोस्टर तात्काळ काढा. आदेश मिळाल्यानंतर मनसे कार्यकर्त्यांनी काही तासांतच हे बॅनर उतरवले.

अशा बॅनरबाजीवर मनसेचे यशवंत किल्लेदार यांनी म्हटले आहे की, शिवसेना भवन किंवा शिवाजी पार्क परिसरात अनेक कार्यकर्ते स्वत:हून बॅनर लावतात, ती पक्षाची भूमिका नसते. बहुतांश वेळा कार्यकर्ते नेत्यांचं लक्ष वेधण्यासाठी किंवा प्रसिद्धी मिळवण्यासाठी असा अट्टाहास करतात.शिवाजी पार्क, शिवसेना भवन परिसरात ठाकरे बंधू यांचे एकत्रित बॅनर लावण्यात आले होते यावर शिवसेना ठाकरे गटाकडून किशोरी पेडणेकर यांनी आपली भूमिका मांडली. ते पोस्टर कोणी लावलं होतं हे बघितलं पाहिजे. जर ते पोस्टर त्यांनीच लावलं असेल, त्यांच्या पक्षाने ते काढलं असेल तर त्यावर त्यांनाच विचारलं पाहिजे, असे पेडणेकर यांनी म्हटलं. उमेदवारांना फॉर्म वाटप करण्याआधी युती व्हायला हवी, आता दोन नेते युती कधी करायची हे लवकर ठरवतील. याशिवाय कोणाला तिकीट द्यायचं हे दोन ठाकरेंना ठरवू द्यात, असेही किशोरी पेडणेकर यांनी म्हटले.

# युतीची चिंता करू नका, जे काम केले त्यावरच निवडणूक लढवा-एकनाथ शिंदे यांचे आदेश

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुंबईतील आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांनी नंदनवन निवासस्थानी महत्वाची बैठक बोलावली. या बैठकीला मुंबईतील आमदार, खासदार तसेच महत्त्वाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडणूक जवळ येत असताना, मागील दोन-अडीच वर्षात झालेल्या कामांचा आढावा घेणे आणि पक्षाची संघटन रचना मजबूत करणे या दोन्ही गोष्टींवर शिंदे यांनी भर दिला. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, शिवसेनेसोबत राहून त्यांच्यावर विश्वास ठेवत आलेल्या नगरसेवकांना पुन्हा निवडून आणणे ही जबाबदारी प्रत्येक आमदार व खासदाराने स्वीकारावी.बैठकीदरम्यान शिंदेंनी सांगितले की, २०२२ पासून त्यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत अनेक विकासात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीत हीच कामे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे निर्देश त्यांनी कार्यकर्त्यांना दिले. विशेषतः क्लस्टर डेव्हलपमेंट, कोस्टल रोड, मेट्रो प्रकल्प, गृहनिर्माण विभागाचे पुनर्विकास प्रकल्प अशा योजनांमुळे मुंबईच्या विकासाला मोठा वेग आला असून याचे माहितीपत्रक घरोघरी पोहोचवण्याचे आदेश त्यांनी दिले. आपण जे काम केले आहे त्यावरच निवडणूक लढवा, युतीची चिंता करू नका, असेही शिंदे कार्यकर्त्यांना म्हणाले.शिंदेंनी मुंबईतील घरकुलाच्या समस्येवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे संकेत दिले. मुंबईत स्वतःचे घर मिळावे ही प्रत्येक मुंबईकराची इच्छा आहे आणि ती पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात धोरणात्मक कामे सुरू आहेत, असे त्यांनी



पदाधिकाऱ्यांना सांगितले. मतदानाच्या वेळी घरकुल, पुनर्विकास, क्लस्टर प्रकल्प, कोस्टल रोड आणि मेट्रोसारख्या विषयांवर जनतेशी संवाद साधण्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. तसेच, जो विश्वास ठेवून त्यांच्या नेतृत्वासोबत उभा राहिला त्या नगरसेवकांना पुन्हा प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे शिंदेंनी ठामपणे सांगितले.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाचा त्याग करून शिंदे गटासोबत आलेल्या नगरसेवकांना युतीत योग्य जागा मिळवून देणे आणि त्या सर्वांना जिंकवून आणणे ही जबाबदारी पूर्णपणे आमदार आणि खासदारांच्या खांद्यावर दिली आहे. यामुळे या निवडणुकीत खासदार-आमदारांना प्रभागनिहाय रणनीती आखावी लागणार आहे. निवडणुकीत भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांची युती असल्याने जागावाटप कसे होणार यावर अजूनही चित्र स्पष्ट नाही. मात्र शिंदेंनी स्पष्ट केले की, युतीचे तांत्रिक निर्णय वरिष्ठ नेते घेतील आणि पदाधिकाऱ्यांनी आपल्या क्षमतेनुसार काम करत राहावे.मुंबईतील महापालिका निवडणूक गेली अनेक वर्षे रखडलेली असताना, यंदा सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. शिंदे गटाच्या या बैठकीनंतर निवडणुकीची गती आणखी वाढेल असे मानले जाते. शिंदेंच्या निर्देशांनुसार, विभागनिहाय विकासकामांचा अहवाल तयार करून तो जनतेपर्यंत पोहोचवला जाणार आहे. यामुळे निवडणूक प्रचारात विकासाचा मुद्दा अग्रस्थानी राहणार आहे. जागावाटपाबाबत अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसली तरी, शिंदे यांनी दिलेल्या आदेशामुळे शिवसेना गटाने आता प्रत्यक्ष निवडणूक मोहिमेला सुरुवात केली आहे.

# तळोदा नगरपरिषद निवडणुकीचा 'सस्पेन्स'! उमेदवारी अर्ज भरण्यास केवळ २ दिवस शिल्लक; तरीही एकाही पक्षाचा 'अधिकृत उमेदवार' जाहीर नाही!

## भाजपमध्ये मोठी चढाओढ; तर काँग्रेसची गूढ शांतता: बंडखोरीची भीती की वेगळी रणनीती?

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

सार्वत्रिक नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी अर्ज भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना, तळोदा नगरपालिकेच्या राजकारणात सध्या कमालीचा सस्पेन्स आणि उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अर्ज भरण्यासाठी केवळ दोन दिवस शिल्लक असतानाही, जिल्ह्यातील सर्वाधिक लक्षवेधी ठरलेल्या या निवडणुकीत एकाही प्रमुख राजकीय पक्षाने आपल्या अधिकृत उमेदवारांची घोषणा केलेली नाही.

**नगराध्यक्ष पदासाठी भाजपमध्ये 'फाइट'; सूर्यवंशींचे नाव चर्चेत!.**

मागील निवडणुकीचा इतिहास पाहता, तळोद्यात खरी लढत भाजप आणि काँग्रेसमध्येच होत आली आहे. मात्र, यंदा भाजपमध्ये इच्छुकांनी मोठी गर्दी केल्यामुळे उमेदवारीचा निर्णय घेणे पक्षासाठी डोकेदुखी ठरली आहे. भाजपमध्ये मोठी चढाओढ सुरू असल्याने, उमेदवारी कोणाला मिळते याकडे तळोदा शहराचे लक्ष लागून आहे.शहराच्या गल्लीबोळात सध्या चर्चा आहे की, जितेंद्र सूर्यवंशी यांना भाजपकडून उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. तडफदार आणि उमदा चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असले तरी, पक्षाकडून अधिकृत दुजोरा न मिळाल्याने सस्पेन्स कायम आहे. तिकीट नाकारले गेल्यास भाजपमध्ये बंडखोरी होण्याची दाट शक्यता असल्याने पक्षश्रेष्ठी अतिशय सावध भूमिका घेत असल्याचे दिसत आहे. दरम्यान, शिवसेना (शिंदे गट) या सगळ्या गोंधळात आघाडीवर असल्याचे दिसत आहे. त्यांनी आपला अधिकृत उमेदवार जाहीर केला नसला तरी, हितेंद्र क्षत्रिय यांच्या रूपाने सोशल मीडियावर प्रचाराला सुरुवात केली आहे. यावरून शिंदे सेनेचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार हितेंद्र क्षत्रियच असतील का? हा




प्रश्न देखील जनतेला पडला आहे.

**काँग्रेस पक्ष नेमकी कोणती खेळी खेळतोय?.**

या निवडणुकीत सर्वात गूढ आणि धक्कादायक चित्र काँग्रेस पक्षाचे आहे. एकेकाळी भाजपला कडवी लढत देणारा काँग्रेस पक्ष यंदा कुठेही समोर येताना दिसत नाही. यामुळे काँग्रेस पक्षामध्ये नेमकी कोणती हालचाल सुरू आहे, याचा मागमूस जनतेला लागत नाहीये. काँग्रेसचे वरिष्ठ नेते कोणत्या गोष्टीवर लक्ष केंद्रित करत आहेत, हेच स्पष्ट होत नाही. जनतेमध्ये अशी जोरदार चर्चा आहे की, भाजपमध्ये उमेदवारी नाकारल्यास होणाऱ्या बंडखोर उमेदवारांना आपल्याकडे खेचून, तुल्यबळ लढत देण्याची काँग्रेसची रणनीती तर नाही ना? शहादा, नंदुरबार, तळोदा आणि नवापूर या चारही ठिकाणांपेक्षा तळोद्यातील निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. पक्ष उमेदवारी जाहीर करण्यासाठी एवढा उशीर का लावत आहेत? प्रत्येक पक्षाला बंडखोरीची भीती वाटत आहे का, अशी शंका जनतेच्या मनात उफाळून येत आहे. आता जास्त वाट न पाहता पक्षांनी आपले अधिकृत उमेदवार तातडीने जाहीर करावेत, जेणेकरून जनतेच्या मनातील संभ्रम दूर होईल आणि उमेदवार तसेच कार्यकर्त्यांना प्रचाराला जोमाने सुरुवात करता येईल.

# बोरगावकरांचा स्तुत्य उपक्रम,बेरोजगार तरुण यांना गावातच रोजगार उपलब्ध करुन दिला

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

वाढत्या महागाईच्या काळात केवळ पोटाची खळगी भरण्यासाठी १० ते २० हजार पगारावर गाव खेड्यातून लागेल त्या कामासाठी गावातील तरुणांची शहराकडे जाणारी संख्या दिवसेंदिवस वाढतच चालली आहे.त्यामुळे आज आपल्याला गावखेडे ओसाड पडलेली पाहायला मिळतात. त्यामुळे आज गावामध्ये फक्त वयस्कर मंडळी दिसून येते त्यांची मुले शहराकडे गेल्यामुळे एकत्र कुटुंब पद्धती संपुष्टात आलेली आहे. उतरत्या काळात आई बापाला स्वतःच्या मुलाचा देखील आधार मिळत नाही.त्यामुळे कितेक वृद्ध दांम्पत्य आज बेवारस आणि वृद्ध आश्रमात पहायला मिळत आहेत हे संपूर्ण समाजच चित्र डोळ्यासमोर ठेवून बोरगाव बु येथील नेहमी तरुणांना गाव सोडून १० ते




२० हजार पगारासाठी पुणे,मुंबईला बाहेर जाण्यापेक्षा इथेच कामधंदा करून वयस्कर आई वडिलांचा आधार बना असे सांगणारे समाजसेवक,खंडोबा देवाचे वसारी धारक गोपाळ देव निंगुळे यांनी गावातच व्यवसाय करण्याचा सल्ला देण्या ऐवजी स्वतः कृतीतून गोपाळ देवाचा चहा ह्या नावाने चहाचे हॉटेल चालू करून गावातील तसेच केज तालुक्यातील बेरोजगार तरुणांनी कमी भांडवली व्यवसाय कसा करायचा याच उत्तम उदाहरण दिलेले आहे. त्यामुळं जवळपासच्या गावातील तरुण गोपाळ देवाच्या कृतीतून केलेल्या कार्याचे स्वागत करत आहेत.त्यामुळे गोपाळ देवाचे समाजाबद्दल असलेली तळमळ आणि सामाजिक कार्य दिसून येत आहे.गोपाळ देव यांनी स्वतः छोटाव्यवसाय चालू करून गावातील व समाजातील बेरोजगार तरुणांना गाव सोडून बाहेर जाण्यापेक्षा गावातच व्यवसाय करा, निर्व्यसनी राहा व जन्मदात्या आईवडिलांचा आधार बना असा सल्ला दिलेला आहे.बोरगाव बु येथील ग्रामस्थांनी याचे स्वागत करुन तरुणांना गावातच रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याचे ठरवले आहे.

# भारतीय जनता मजदूर संघाच्या प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी तर मराठवाडा सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची निवड

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय जनता मजूर संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. शांताप्रकाशजी जाटव भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय प्रशिक्षण प्रभारी अनुसूचित जाती व जन जाती प्रमुख यांच्या आदेशानुसार भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी प्रदेश सचिव पदी धनंजय कुलकर्णी यांची नियुक्ती केली तर मराठवाडा विभागीय सचिव पदी चंद्रकांत पाटील यांची नियुक्ती केली आहे.यावेळी असंघटित मजूर यांच्या न्याय हक्कासाठी प्रयत्न करणारी संघटना असून यासाठी राज्य स्तरावर विविध विभागाची बांधणी करून सर्व विभागाच्या मजूर व गोरगरीब लोकांसाठी काम करण्यासाठी आदेशीत केले.भारतीय जनता मजदूर संघ हा भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून काम




करणारी संघटना असून या संघटनाच्या सर्व प्रकारच्या माध्यमातील काम करणाऱ्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत आहे.औदयोगिक विभाग,सामाजिक विभाग,पत्रकारिता, सिनेमा,हॉटेल,जिनीग कामगार,ऑईल मिल कामगार,साखर कारखाना कामगार, स्कुल कामगार,तसेच असंघटीत क्षेत्रातील सर्व कामगार अशा सर्व विभागातील कामगारांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी तसेच बांधकाम मजुरांना ज्या सुविधा सध्या मिळत आहेत त्या सर्व सुविधा इतर कामगारांना पण मिळायला हव्यात यासाठी काम करायचे आहे.यासाठी गाव पातळी पासून ते देश पातळीपर्यंत सांघिक बांधणी करत सामाजिक विकास साध्य करायचा आहे व भारताचे पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी यांच्या सबका साथ सबका विकास या संकल्पनेला सार्थ ठरवण्यासाठी काम करायचे असल्याचे राष्ट्रीय चिटणीस श्री.भाऊसाहेब घोडके यांनी यावेळी बोलताना सांगितले. यावेळी श्रीनिवास केजकर,शिवराज मुथळे, संदीप भूतडा हे यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी धनंजय कुलकर्णी व चंद्रकांत पाटील यांना निवडीचे पत्र देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# मारुती लिंगनवाड यांना गागलेगाव गण पंचायत समिती निवडणूक लढवावी जनतेतून जोरदार चर्चा

दैनिक वादळ वार्ता
**हनुमंत चंदनकर । प्रतिनिधी**

जनस्वराज्य संस्था निवडणूक पंचायत समिती गण गागलेगाव मधून या वेळेस... नवतरुण व समाजसेवा विविध प्रकार चे अंदोलन उपोषण विध्यार्थी व माता भगिनी साठी महामंडळ बस ची सुविधा करून देणे.. सर्व मित्र परिवार च्या मदतीला धावणे.. गरजू लोकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष कडून मदत मिळवून देणे.. शेतकरी साठी कोरडा दुष्काळ जाहीर करावा. म्हणून पाठपुरावा करणे.. राजसाहेब ठाकरे निष्ठावंत महाराष्ट्र सैनिक व मा. उद्धव बाळासाहेब ठाकरे चाहते म्हणून सर्व विभागमध्ये ओळख निर्माण करणारे. श्री. मारोती उर्फ स्वराज गंगाधरराव लिंगनवाड यांना गागलेगांव पंचायत समिती गट गणातून उमेदवार म्हणून दिल्यास... त्यांना प्रचंड मताने निवडून आणू सर्व गावा गावात गल्ली मध्ये. तरुणाई मध्ये व लहान थोर जेष्ठ नागरिक. माता भगिनी यांच्या मध्ये जोरदार चर्चा होत आहे आनंदी



वातावरण सर्व मध्ये दिसत आहे त्यांच्या राजकीय पार्श्वभूमी पाहता विरोधी गटांना घाम फुटेल असे यांचे नेतृत्व आहे त्यांनी अनेक संघर्ष समाजाचे उत्तम जनसेवा यासह अपंग विधवा विदुर निराधार यांची जनसेवा करून अनेक उत्तम कार्य ते केले त्याच्या कार्याची उत्तम दखल घेऊन असा व्यक्ती जनसेवेसाठी असावा अशी बिलोली तालुक्यातील गाव गावात चर्चा होत आहे व गागलेगाव गणातून पंचायत समिती सदस्य म्हणून पाठवून द्यावे अशी आमची इच्छा आहे तरी त्यांना उमेदवारी द्यावी अशी जनतेतून जोरदार चर्चा होत आहे..

# निमोनिया प्रतिबंधासाठी नंदुरबार जिल्ह्यात 'सांस' अभियानाचा शुभारंभ

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार, प्लॅन इंडिया आणि रेकिट यांच्या सहकार्याने पाच वर्षांखालील माता आणि बालकांसाठी स्वयं-काळजी प्रकल्प या उपक्रमांतर्गत 'सांस' (निमोनिया निष्प्रभ करण्यासाठी सामाजिक जाणीव आणि कृती) या जनजागृती अभियानाचा नंदुरबार जिल्ह्यामध्ये शुभारंभ करण्यात आला.




जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्या हस्ते या अभियानाचे उद्घाटन झाले. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रवींद्र सोनवणे, तसेच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल विकास सेवा) हरिभाऊ हाके उपस्थित होते.

या 'सांस' अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे पाच वर्षांखालील बालकांमध्ये होणाऱ्या निमोनिया या आजाराबद्दल समाजात जाणीव निर्माण करणे, तसेच या आजाराचे लवकर निदान आणि वेळेवर उपचार निश्चित करणे हा आहे. हे अभियान दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. या काळात बालकांचे आरोग्य जपण्यासाठी विविध स्तरांवर आरोग्य जाणीव कार्यक्रम, प्रशिक्षण आणि समुदाय आधारित उपक्रम आयोजित केले जाणार आहेत. नंदुरबार जिल्ह्याच्या ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये या अभियानाची व्यापक अंमलबजावणी करण्यासाठी आरोग्य विभाग, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत.

### १३ प्रभागातील २६ नगरसेवकांच्या उमेदवा-या केल्या जाहिर

# आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत नगराध्यक्षा पदासाठी आतार मेहरुनबी खलील पटेल यांची उमेदवारी केली जाहीर

## नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील-आ.प्रकाश सोळंके

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । दर्शन डोंगरे**

नगरपालिकेची रणधुमाळी सुरू असुन अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवा-या आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत जाहिर करत नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील असा विश्वासही आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि. १५ नोव्हेंबर शनिवार रोजी सायंकाळी ४:०० वाजता आयोजित पत्रकार परिषदेत आ. प्रकाश सोळंके यांनी राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षपदासाठी
आतार मेहरुनबी खलील पटेल (ना.मा.प्रा.महीला राखीव) यांच्यासह १३ प्रभागातील २६ नगरसेवक





पदाच्या उमेदवा-या जाहिर केल्या. दरम्यान यावेळी पालिका ताब्यात असतांना शहरात केलेली स्वच्छता, पाणीपुरवठ्यासह विवीध विकासकामांचा पाढा त्यांनी वाचला. त्याचबरोबर आगामी काळात पालिका ताब्यात आल्यास निश्चीतच भुमिगत नाल्या, आठवडी बाजाराच्या जागेचा प्रश्न,नाट्यगृह उभारणीसह अनेक विकासकामे पुर्णत्वाकडे घेवुन जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. या पत्रकार परिषदेला सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके,माजी नगराध्यक्ष नासेर खॉ पठाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, खलील पटेल, कल्याण आबुज, डॉ.वसिम मनसबदार,अच्युत लाटे यांची उपस्थिती होती. या नावांची केली घोषणा-राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे ना.मा.प्रा.महिला राखीव उमेदवार निरोनिसा खलील आत्तार पटेल हे तर प्रभाग १ मध्ये रेखा सरोदे,मालती पाठक,प्रभाग २ मध्ये रत्नमाला राकेश साळवे,शेख इम्रान, प्रभाग ३ मध्ये राज सय्यद नूर,पठाण नाजीया जुनेदखान,प्रभाग ४ मध्ये नवनाथ गायकवाड, कलावती फरके, प्रभाग ५ मध्ये मनिषा रेदासनी, राहुल लंगडे, प्रभाग ६ लता लाटे, शेख मजीद, प्रभाग ७ मध्ये वैशाली प्रशांत शेटे,विजय शिंदे, प्रभाग ८ मध्ये यास्मिन तांबोळी, शेख तौफिक, प्रभाग ९ मध्ये मोसिन जलील बागवान, सुनीता प्रल्हाद होके, प्रभाग १० मध्ये राधिका घाडगे,दिनकर होके,प्रभाग ११ मध्ये कोमल वारकड,मतीन शेख,प्रभाग १२ मध्ये उषा बनसोडे, सय्यद रफिक अली, प्रभाग १३ मध्ये सुदामती पोळ, रेहानाबी शेख यांच्या उमेदवाऱ्या जाहीर झाल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077